दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार | 6 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 259 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

बातम्या व जाहीरातीसाठी संपर्क 8421577797

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# मुंबई, पुण्यानंतर आता नाशिककरही सततच्या वाहतूक कोंडीमुळे होणार हैराण

## तब्बल वर्षभर सोसावी लागणार वाहतूक कोंडी



■ नाशिक वृत्तसंस्था


मुंबई पुण्याप्रमाणेच आता नाशिककरांनाही रोजच्या वाहतूक कोंडीला सामोरं जावं लागणार आहे. एक - दोन महीने नाही तर तब्बल वर्षभर नाशिककरांना या वाहतूक कोंडीतूनच प्रवास करावा लागणार आहे. नाशिक शहरात एकाच वेळी अनेक रस्त्यांची कामं सुरू असल्याने ही परिस्थिति निर्माण झाली आहे. लवकरच नाशिक द्वारका येथील ग्रेड सेप्रेटरच्या कामास सुरूवात होणार असल्याने ही वाहतूक कोंडी होणर आहे. तसेच इतर मार्गांवरची कामेही सुरू होणार असल्याने नाशिककरांना निदान वर्षभरतरी या वाहतूक कोंडीतून सुटका मिळण्याची शक्यता कमीच आहे. शहरात एकाचवेळी तब्बल ३० रस्त्यांची व ४ उड्डाणपुलांची विकास कामे, दुरुस्ती, आणि रुंदीकरणाचे काम सुरू करण्यात येणार आहे. त्यात द्वारका येथील ग्रेड सेप्रेटरचे काम सुरू असेल. याच पार्श्वभूमीवर आता पालिकेने पर्यायी मार्गांची सोय केली आहे.

पर्यायी मार्ग कोणते ?

द्वारका चौकात येणाऱ्या मोठ्या वाहनांसह एसटीबसेस, सिटी लिंक बसेसलाही प्रवेश बंद करण्यात आला आहे. शहरातून जाण्यासाठी या वाहनांना फेम थिएटर, पुढे बडाळागाव गाव कलानगर सिग्नल आणि पुढे पाथर्डी फाटा अथवा लेखानगरमार्गे मुंबई नाका असा पर्याय आहे. काही वाहनांना वडाळगावाजवळून साईनाथनगर चौफुली आणि पुढे इंदिरानगर अंडरपास व पुढे मुंबईनाका हा रस्ता देण्यात आला आहे. जाणाऱ्या वाहनांचा ताणही इंदिरानगर जॉगींग ट्रॅक रस्त्याने रवीशंकर मार्ग आणि डीजीपीनगर असा राहिल, जड अवजड वाहनांना दिवसभर शहराबाहेर रोखून धरण्याची व्यवस्था नसल्याने या वाहनांना बसेसबरोबर इंदिरानगर भागातूनच जावे लागेल.

# अंबाजोगाई ते सेलूअंबा जोडणारा रस्ता तात्काळ दुरुस्त करा : अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे निवेदन

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)





तालुक्यातील महत्त्वाचा असणारा व लातूर जिल्ह्याकडे जाणारा अंबाजोगाई ते सेलूअंबा जोडणारा रस्ता तात्काळ दुरूस्त करा अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी अपर जिल्हाधिकारी यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीपराव पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी अपर जिल्हाधिकारी यांना मंगळवार, दिनांक ३ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनातून एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंबाजोगाई तालुक्यातील सेलूअंबा या गावी जाण्यासाठी जो पोखरी मार्गे रस्ता आहे. या रस्त्याला शहरी व ग्रामीण भागातील वाहतूक, वर्दळ खूप मोठ्या प्रमाणात आहे. सेलूआंबा, सायगाव, सुगाव, नांदगाव, बर्दापूर, चाडगाव, मोटेगाव, मुडेगाव तसेच लातूर जिल्ह्याकडे जाणारा व इतर अनेक गावांकरिता हा रस्ता अत्यंत उपयुक्त आहे. एक तर हा रस्ता सिंगल व अरूंद आहे. त्यात अनेक ठिकाणी जागोजागी खड्डे व रस्ता पूर्णपणे नादुरूस्त झालेला आहे. त्यात खरोळा नदीच्या पुलापाशी तर रस्ता हा पूर्णपणे खचलेला आहे. साधी मोटरसायकल ही यावर दिवसा नीट जाऊ शकत नाही. तर चार चाकी वाहनाला मोठी कसरत करावी लागते. याच रस्त्यावरून रात्रीच्या वेळी मोठ्या अपघातास निमंत्रण देण्यासाठी संबंधित गुत्तेदाराने हा रस्ता असाच ठेवला आहे का..? असा प्रत्येक नागरिक व वाहनधारकाला प्रश्न पडतो आहे. त्यामुळे या नादुरूस्त रस्त्याकडे प्रशासन व बांधकाम विभाग यांनी जातीने लक्ष द्यावे, यापूर्वी प्रसारमाध्यमांनी बातम्या प्रसिद्ध केल्या व सुजाण नागरिकांनी अनेकदा नाराजी व्यक्त करून ही मागील अनेक महिन्यांपासून हा नादुरूस्त व खचलेला रस्ता कंत्राटदार दुरूस्त करीत नाहीत, कदाचित ते गंभीर दुर्घटनेची वाट पाहत आहेत की, काय अशी शंका सर्वसामान्य नागरिकांना येते आहे. यात प्रशासन व बांधकाम विभाग यांनी दुर्घटनेची वेळ येण्या अगोदर जो कोणी गुत्तेदार आहे. त्यांच्याशी संपर्क करून नादुरूस्त व खचलेला रस्ता पूर्णपणे तात्काळ दुरूस्त करावा व नागरिकांच्या वित्त व जीवितहानीची काळजी घ्यावी, अंबाजोगाई ते सेलूअंबा जोडणारा रस्ता तात्काळ दुरूस्त करावा अन्यथा या मागणीसाठी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीपराव पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी निवेदनातून दिला आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी माहितीस्तव उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, जि.प.बांधकाम विभाग अभियंता, बांधकाम उपविभाग कार्यालय आणि जि.प.बां.विभाग अधिकारी जि.प.बां.विभाग कार्यालय, अंबाजोगाई यांना देण्यात आलेल्या आहेत. सदरील निवेदनावर बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, जिल्हा कार्याध्यक्ष जहाँगीर पठाण, शहराध्यक्ष ऋषिकेश मोरे, शहर उपाध्यक्ष विजयानंद सोळंके, गणेश चव्हाण, ओमकार चव्हाण, भास्कर कदम, प्रशिक सिरसाट, धनंजय सुरवसे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.







# प्रा. पवन मुंडे यांनी घेतला सभापती पदाचा पदभार; अनेकांनी दिल्या शुभेच्छा, सर्वसामान्यांच्या कामाला प्राधान्य देण्याची ग्वाही

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ नगर परिषदेत तील बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी आज आपल्या पदाचा पदभार घेतला. यावेळी विविध मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. सर्वसामान्यांच्या कामाला प्राधान्य देणार असल्याची ग्वाही प्रा. पवन मुंडे यांनी यावेळी दिली.

परळी वैजनाथ नगर परिषदेत बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी आज नगर परिषदेतील आपल्या कार्यालयात पदाचा पदभार घेतला. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी यांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे आपल्यावर फार मोठी जबाबदारी टाकली आहे. त्यांनी दाखवलेला विश्वास आपण सार्थ करून दाखवणार असल्याचे सांगून हे पद अधिकाराचे नाही तर सेवेचे आहे याची जाणीव ठेऊन सर्वसामान्यांच्या कामाला आपण प्राधान्य देणार असल्याचे प्रा. पवन मुंडे यांनी सांगितले. यावेळी नगरपालिकेतील विविध विभागाचे सभापती, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते यांनी प्रा. पवन मुंडे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. दरम्यान पदभार घेताच प्रा पवन मुंडे यांनी बांधकाम विभागातील अधिकारी कर्मचारी यांची मीटिंग घेऊन सविस्तर चर्चा केली.

# मूल्याधिष्ठित शिक्षणाशिवाय शाळा म्हणजे रोबोट तयार करणारी फॅक्टरी ठरेल”: मयांक गांधी




## माऊंट लिटरा झी स्कूलचे पहिले वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**परळी / प्रतिनिधी**

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे आजचे जग कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित बनले आहे. कामे अधिक वेगाने आणि कमी श्रमात होत असली, तरी त्यातून तीव्र स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा काळात केवळ पुस्तकी ज्ञान देणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, मूल्ये आणि जीवनदृष्टी रुजविणे अत्यावश्यक आहे. अन्यथा आपण विद्यार्थी घडवत नसून शाळा म्हणजे रोबोट तयार करणारी फॅक्टरी ठरेल, असे परखड मत ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयांक गांधी यांनी व्यक्त केले. ते परळी येथील माऊंट लिटरा झी स्कूलच्या पहिल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

परळी येथील माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आयोजित करण्यात आलेले पहिले वार्षिक स्नेहसंमेलन बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता शाळेच्या प्रांगणात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमाला पालक, नागरिक व



मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक व विश्वस्त मा. मयांक गांधी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, गीत, समूहगायन तसेच देशभक्तीपर सादरीकरणातून आपली कला, आत्मविश्वास आणि सर्जनशीलता प्रभावीपणे सादर केली. प्रत्येक सादरीकरणाला उपस्थितांकडून टाळ्यांचा कडकडाट आणि भरभरून दाद मिळाली.

या कार्यक्रमास नगर परिषद परळीच्या अध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी, झी लर्नचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. भूषण कुमार, परळी संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पीआय धनंजय धोणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच एच.




के. अवचार, शीतल सवृज्ञ, भास्करराव चाटे, बाळासाहेब देशमुख, डॉ. रामेश्वर बंगाड, ज्येष्ठ नेते दत्ता आप्पा इटके, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, सौ. शिवानी जैन, सौ. शीतल पन्नालिया, किर्ती कुमार देशमुख व सागर राऊत यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा, उपाध्यक्ष प्रा. कैलास घुगे व प्राचार्य मंगेश काशीद सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. पालक व नागरिकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावले असून संपूर्ण कार्यक्रम उत्साह, आनंद आणि सकारात्मकतेच्या वातावरणात पार पडला.

# लोकरंजन

## सिनेरंग : 'तिघी'मधील भावस्पर्शी गाणं प्रेक्षकांच्या भेटीला




आई आणि मुलींचं नातं हे केवळ जन्माने जोडलेलं नसतं, तर ते आयुष्यभर साठत गेलेल्या आठवणींनी, संस्कारांनी, न बोललेल्या भावनांनी आणि एकमेकांसाठी असलेल्या मूक समजुतींनी घडलेलं असतं. कधी त्या नात्यात हसरे, हलके क्षण असतात, तर कधी अपेक्षा, वेदना आणि अंतरही... तरीही मनाच्या खोल कुठेतरी हे नातं कायम घट्ट गुंफलेलं असतं. अशाच भावनांचा, नात्यांच्या नाजूक छटांचा हळुवार वेध घेणारा आगामी मराठी चित्रपट म्हणजे ‘तिघी’. या चित्रपटातील ‘हास जराशी’ हे भावनिक गाणं नुकतंच प्रेक्षकांच्या भेटीला आलं असून, अल्पावधीतच ते मनाला स्पर्श करून जात आहे. आई आणि मुलींच्या नात्यातील हळवे, आनंदी, कधी वेदनांनी ओथंबलेले, तर कधी आशेने उजळलेले क्षण या गाण्यात सुंदरपणे उलगडताना दिसतात. दुःख आणि सुख, अंतर आणि आपुलकी या सगळ्यांचा एक भावनिक प्रवास हे गाणं मांडतं.

जितेंद्र जोशी यांच्या संवेदनशील आणि अर्थपूर्ण शब्दांना अद्वैत नेमळेकर यांचं हृदयाला भिडणारं संगीत लाभलं असून, सोनू निगम यांच्या जादुई आवाजामुळे हे गाणं अधिकच भावस्पर्शी झालं आहे. भारती आचरेकर, सोनाली कुलकर्णी आणि नेहा पेंडसे बायस या तिघींवर चित्रित झालेलं हे गाणं त्यांच्या नात्यातील भावनिक बंध, हसरे क्षण आणि न बोललेली वेदना प्रभावीपणे समोर आणतं. सुप्री मीडिया प्रस्तुत आणि कोक्लिको पिक्चर्स निर्मित ‘तिघी’ या चित्रपटात भारती आचरेकर, सोनाली कुलकर्णी आणि नेहा पेंडसे बायस यांच्या प्रमुख भूमिका असून, चित्रपटाची कथा व दिग्दर्शन जीजिविषा काळे यांनी केलं आहे.

## बालकलाकार अवनी जोशीची "मर्दानी 3" मध्ये मध्यवर्ती भूमिका

राणी मुखर्जीचा बहुप्रतिक्षित मर्दानी 3 हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला असून सिनेमाची कथा मुलींच्या बेपत्ता होण्याच्या आणि अपहरणाभोवती फिरते. यशराज फिल्मस्ची निर्मिती असलेल्या अभिराज मिनावाला यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटात अभिनेत्री राणी मुखर्जीबरोबरच मल्लिका प्रसाद आणि जानकी बोडीवाला महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. ट्रेलरनंतर खलनायिकेच्या भूमिकेतील मल्लिका प्रसाद यांच्या अभिनयाची विशेष चर्चा होत आहे. या चित्रपटाची आणखीन एक विशेष बाब म्हणजे मराठमोळी बालकलाकार अवनी जोशी या चित्रपटामध्ये एका महत्वपूर्ण भूमिकेत झळकणार असून अभिनेत्री राणी मुखर्जी सोबत झळकण्याची संधी तिला या चित्रपटाच्या निमित्ताने मिळाली आहे.आजवर अनेक मराठी मालिका, रिॲलिटी शो आणि नुकत्याच प्रदर्शित झालेल्या "जारण" या चित्रपटामध्ये आपण तिच्या अभिनयाची उत्तम झलक पाहिली होती. अवनी जोशी ही सुप्रसिद्ध गायक अनिरुद्ध जोशी आणि गायिका रसिका जोशी यांची मुलगी आहेयशराज फिल्मच्या टीमकडून तिला ऑडिशनसाठी बोलवण्यात आले आणि या ऑडिशनमधून एक एक टप्पे पार पाडत तिने हा रोल पटकावला.




## ‘तारिणी‘मध्ये रंगणार महाराष्ट्राच्या कॅबिनेट मंत्र्यांची खास मुलाखत



लोकप्रिय मालिका ‘तारिणी’* मध्ये प्रेक्षकांना लवकरच एक वेगळ आणि रंजक वळण पाहायला मिळणार आहे. कौशिकीच्या MNN या न्यूज चॅनेलवर गाजत असलेल्या ‘थेट भेट’ या कार्यक्रमात एका खास मुलाखतीचा थरार रंगणार आहे. या कार्यक्रमात राजकारणी आणि सिनेस्टार्सची थेट मुलाखत घेतली जाते.याच कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री बापुराव जामखंडी यांची खास मुलाखत घेण्यात येणार आहे. ही मुलाखत नेहमीप्रमाणे कौशिकी घेणार हे निश्चित होत, पण कामाचा जास्त ताणामुळे ती अचानक बेशुद्ध पडते. त्यामुळे सेटवर एकच गोंधळ उडतो, आता ही महत्त्वाची मुलाखत कोण घेणार, असा प्रश्न सगळ्यांसमोर उभा आहे. याच वेळी दयानंद सुचवतात की ही मुलाखत केदारने घ्यावी. आता केदार एका पत्रकाराप्रमाणे मंत्री महोदयांची सर्व माहिती गोळा करतोय. मुलाखतीदरम्यान केदार एक सर्वसामान्य माणूस म्हणून त्यांना प्रश्न विचारतो. तो बापुराव जामखंडी यांच्या आयुष्याचा, संघर्षाचा आणि राजकीय प्रवासाचा सखोल आढावा घेतो. या मुलाखतीसाठी केदारला कौशिकीचा नवरा शेखर मदत करतो. ही मुलाखत प्रेक्षकांना खूप भावते आणि सोशल मीडियावर ती मोठ्या प्रमाणात व्हायरल ही होते. कॅबिनेट मंत्री बापुराव जामखंडी यांची भूमिका ज्येष्ठ अभिनेते अनंत जोग साकारणार आहेत. त्यांची व्यक्तिरेखा थेट, स्पष्टवक्ती आणि प्रभावी आहे. ज्यामुळे कथेला आणखी वेगळं वळण मिळणार आहे.ही व्हायरल मुलाखत पुढे काय परिणाम घडवणार? हे जाणून घेण्यासाठी पाहायला विसरू नका ‘तारिणी’, दररोज रात्री ९:३० वा. फक्त आपल्या झी मराठीवर.

**संकलन –संयोजन, सुबोध रणशेवरे**

## राहिलो मी असा हा जसाच्या तसा, हे शिळे चेहरे मात्र नटले कसे



सुप्रसिद्ध गायिका व गान कोकिळा श्रीमती लता मंगेशकर ह्या कविवर्य सुरेश भटांबद्दल लिहिताना म्हणतात तुमचे व्यक्तिमत्व तुमच्या कथा तुमच्या वेदना जीवन जगताना तुम्हाला आलेले कटू अनुभव या साऱ्यांचा अर्क तुमच्या गजलेत व कवितेत उतरला आहे. सुरेश भटांचे व मंगेशकर परिवाराचे अतिशय घनिष्ठ असे नाते होते. सुरेश भटांच्या अनेक कविता व गाण्यांना श्री हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीत दिले आहे. तसेच श्रीमती आशा भोसले यांनी सुरेश भटांच्या अनेक कविता व गजलेचे गायन केले आहे. लता मंगेशकर यांनी सुरेश भटांबाबत केलेले विधान खरेच आहे. सुरेश भटांनी जे काय लिहिले ते अनुभवनिष्ठ आहे. समाजामध्ये त्यांना जे अनुभव आले ते चांगले असोत. वाईट असोत त्यांनी अतिशय समर्थपणे आपल्या काव्यातून मांडलेले आहेत .

या समाजाला जागे करण्याचे त्याच्यासमोर आजची परिस्थिती मांडण्याचे धैर्य त्यांनी दाखवले आहे.

राहिलो मी असा हा जसाच्या तसा
हे शिळे चेहरे मात्र नटले कसे

त्यांच्या ह्या ओळी म्हणजे समाजाचे प्रतिबिंबच आहे. प्रचलित न्याय व्यवस्थेवर भाष्य करताना ते म्हणतात.

बोल आता तरी बोल काहीतरी
ऐनवेळी तुझे ओठ मिटले कसे

वरवर या ओळी जरी प्रेममय वाटत असल्या तरी या ओळीमध्ये सत्य दडलेले आहे.

सध्याच्या परिस्थितीवर भाष्य करताना सुरेश भट म्हणतात

एकमेका किती घ्याल ओवाळूनी
आरतीचे तुम्ही दीप लुटले कसे

सुरेश भटांचे सारेच काव्य हे अद्वितीय असेच आहे. आपल्या व्यथा वेदनांना त्यांनी आपल्या कवितेतून वाट करून दिलेली आहे. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर त्यांनी त्यांचा एक चांगला संप्रदाय तयार केलेला आहे आणि सुरेश भटांनी दिलेला वारसा त्यांचे समर्थ गझलकार गीतकार कवी पुढे चालवित आहेत आणि चालविणारही आहेत.

**– प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे**
**संचालक, मिशन आयएएस,**
अमरावती कॅम्प

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# 'अंकुर मानवतेचा' बालनाट्यातील बालकलाकारांनी जिंकली प्रेक्षकांची मने

(प्रतिनिधी:छत्रपती संभाजीनगर)

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित २२ व्या राज्य बालनाट्य स्पर्धेत, सुंदरेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था (गुंज) संचलित आयुष अकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स, कुं. पिंपळगाव च्या बालचमूंनी आपल्या दमदार अभिनयाने रंगमंच गाजवला.छत्रपती संभाजीनगर येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात ही स्पर्धा सुरू आहे.

लेखक हरिदास घुंगासे यांच्या लेखणीतून उतरलेले हे नाटक मोबाईलच्या आभासी जगात हरवलेली मुले आणि कचरा वेचून जगणाऱ्या अनाथ मुलाची जगण्याची जिद्द यातील संघर्ष प्रभावीपणे मांडते. मानवतेचा खरा अंकुर कसा फुलतो, याचे वास्तववादी दर्शन या नाटकातून घडले. दिग्दर्शक नंदू वाघमारे यांच्या कल्पकतेने विराज दायमा, कार्तिक बहिरे, आयुष घुंगासे, आदिती खडके, ईश्वरी ताठे, दर्शना डोईफोडे आणि तनवी सोळंके या चिमुकल्यांनी एकापेक्षा एक सरस भूमिका साकारत प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

नाटकाच्या यशात तांत्रिक बाजू सांभाळणारे रघुनाथ ताठे, सीमा ताठे तसेच मनीषा घुंगासे, किसन भोईटे, पवन दशरथ, काजल बल्लय्या आणि सपना बलैया यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ग्रामीण भागातील या कलाकारांना राज्य स्तरावर मोठी झेप घेता आली. जालना जिल्ह्याच्या आणि कुं. पिंपळगावच्या या छोट्या सुपरस्टार्सचे सर्वत्र कौतुक होत आहे.रंगकर्मी डॉ.राजू सोनवणे आणि सिनेनाट्य लेखक दिग्दर्शक प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी बालकलावंतांना मार्गदर्शन केले.



# शब्द, श्रद्धा आणि संस्कार यांचा संगम : संजय खाकरे

काही माणसे केवळ बातम्या लिहित नाहीत, तर ती समाजाची नाडी ओळखून शब्दांतून बोलकी करतात. अशीच एक संवेदनशील, अभ्यासू आणि लोकांशी नातं जपणारी लेखणी म्हणजे परळी वैजनाथ येथील दैनिक लोकमतचे ज्येष्ठ वार्ताहर -श्री. संजयभाऊ खाकरे. गेल्या 31 वर्षांहून अधिक काळ पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असलेले संजयभाऊ खाकरे म्हणजे परळी शहरातील विश्वासार्हतेचे प्रतीक बनले आहेत. त्यांच्या निष्ठावान आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत दैनिक लोकमतचा 'स्टार गोल्ड पुरस्कार' त्यांना प्राप्त झाला, ही केवळ वैयक्तिक सन्मानाची बाब नसून परळीच्या पत्रकारितेला मिळालेली मानाची पावती आहे. पत्रकारिता ही त्यांच्यासाठी केवळ उपजीविकेचे साधन नसून समाजाशी संवाद साधण्याचे माध्यम आहे. ते स्वतः बोलायची आवड असल्यामुळे कोणत्याही विषयाचा गाभा समजून, तो मुद्देसूद, संयत आणि सत्याधिष्ठित शब्दांत मांडणे ही त्यांची खासियत आहे. बातमी असो वा समाजातील वेदना—त्यांची लेखणी नेहमीच माणुसकीच्या बाजूने उभी राहिली आहे.

संजयभाऊ खाकरे हे परळी वैजनाथचे पंचम ज्योतिर्लिंग, प्रभू श्री वैद्यनाथ यांचे ते निस्सीम भक्त आहेत. दररोज सकाळी प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घेऊनच ते आपल्या कामाची सुरुवात करतात. श्रद्धा, शिस्त आणि सातत्य या त्रिसूत्रीवर उभा असलेला त्यांचा दिवस त्यांच्या जीवनदृष्टीचे सुंदर दर्शन घडवतो. सर्वांशी अत्यंत गोड बोलणे, मान-सन्मान देणे आणि आपुलकीने संवाद साधणे हा त्यांचा स्वभाव आहे. म्हणूनच परळी शहरात त्यांच्याविषयी केवळ ओळख नाही, तर खरा आदरभाव आहे. आज ६ फेब्रुवारी रोजी वाढदिवस साजरा करणाऱ्या श्री. संजय खाकरे यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि लेखणीला अधिक बळ मिळो, हीच सदिच्छा. त्यांची पत्रकारिता अशीच सत्याची मशाल घेऊन समाजाला दिशा देत राहो, आणि श्री विरभद्र देवता व प्रभू वैद्यनाथांची कृपा सदैव त्यांच्या पाठीशी राहो-हीच मनापासून प्रार्थना!

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

समाजाशी घट्ट नातं



वीरशैव लिंगायत समाजाच्या सर्व सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांमध्ये ते आवर्जून, हिरीरीने सहभागी होत असतात. समाजाशी नातं केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतून जपणारे असे हे व्यक्तिमत्त्व आहे. कुटुंबवत्सलतेची परंपरा त्यांनी जपली आहे. त्यांची दोन्ही मुले उच्च शिक्षण घेत असून, ज्ञान, संस्कार आणि कर्तृत्व यांचा वारसा पुढील पिढीकडे ते शांतपणे सोपवत आहेत.

■

9890338694

संपादकीय...

## मागे वळून पाहताना...

काळ सरकला ; पण त्या काळाने जाता जाता आपल्या पदरात काय टाकले याचा लेखाजोखा घेण्याचा हा प्रयत्न जागतिक अशांतता आणि वारंवार उफाळून येणाऱ्या दहशतवादी प्रवृत्तींच्या शृंखलांनी सरत्या वर्षाला जखडले होते. युद्ध आणि युद्धजन्य परिस्थितीचे चटके अनेक निरपराध्यांनी सोसले. कित्येक निरपराध जीव होरपळले. या सगळ्यांमागे घड्याळाचे काटे उलटे फिरवू इच्छिणाऱ्या राष्ट्रनेत्यांच्या सदोष ध्येयधोरणांचा आणि कल्पनांचा जसा वाटा होता; तसाच सुडाने पेटलेल्या वा पेटवलेल्या जनभावनेचाही होता.

दोन वर्षांपूर्वी रशियाच्या दौऱ्यावर असताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतिन यांना सध्याचे युग युद्धाचे नसल्याचा सल्ला दिला होता. तेव्हा त्यांचा रोख रशियाने काही महिन्यांपूर्वीच युक्रेनवर केलेल्या हल्ल्याच्या दिशेने होता. आता एका दृष्टिकोनातून पाहिले तर पंतप्रधानांचे हे भाकीत चुकीचे म्हणता येईल, कारण गेल्या दोन-चार वर्षांपासून अनेक देशांमध्ये सशस्त्र हल्ले आणि चकमकी सुरू आहेत. म्हणजेच सद्यस्थितीत पंतप्रधानांना अभिप्रेत असणारी शांतता कोठेही दिसत नाही. अर्थात असे असले तरी दुसऱ्या दृष्टिकोनातून पाहता हे सत्यही समोर येते की, या युगात लष्करी सामर्थ्याद्वारे कोणतेही प्रश्न सुटणारही नाहीत. त्यामुळेच लष्करी बळाचा वापर करण्याचा पर्याय कोणत्याही देशाने अवलंबू नये. वर्षाच्या अखेरीस दिसणारी जागतिक परिस्थिती पाहिली तर हेच चित्र स्पष्ट दिसते.

गेल्या तीन वर्षांपासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू आहे; परंतु त्यात कोणत्याही एका बाजूला निर्भेळ यश प्राप्त झालेले नाही. मध्यपूर्वेवर नजर टाकली तर दोन वर्षांपूर्वी 'हमास' या संघटनेने इस्त्रायलवर अचानक हल्ला केला होता. या अचानक झालेल्या हल्ल्यात सुरुवातीच्या एक-दोन दिवसांमध्ये इस्त्रायलचे हजारो नागरिक मारले गेले. नागरिकांना शेकडोंच्या संख्येने बंधक बनवून हमासने गाझामध्ये डांबून ठेवले. सुरुवातीच्या या हल्ल्यातून सावरल्यानंतर इस्त्रायलने प्रत्युत्तरादाखल संपूर्ण गाझावर भयंकर हवाई हल्ले करून तेथील अनेक इमारती, आरोग्य केंद्रे, यंत्रणा जवळपास भुईसपाट केल्या. परिणामस्वरूप, लाखो पॅलेस्टिनी लोकांना घरदार सोडून उघड्यावर राहावे लागले. या हल्ल्यात तीस-चाळीस हजार नागरिकांना प्राण गमवावे लागले.युक्रेन-रशिया युद्धाप्रमाणेच या संघर्षातदेखील कोणत्याही एका बाजूला निर्णायक विजय मिळालेला नाही. मनुष्यबळाची एवढी हानी होऊनदेखील हमास ही संघटना आधी होती तेवढीच मजबूत आहे. पॅलेस्टिनी नागरिकांच्या नरसंहारामुळे जगभर जनमत इस्त्रायलच्या विरोधात झाले. वर्षअखेरीस या घटनेकडे तटस्थपणे पाहिले असता स्पष्ट दिसते की, हमास आणि इस्त्रायल दोघांचेही युद्धाबद्दलचे आडाखे चुकले आहेत. इस्त्रायल आणि हमासमधील संघर्ष त्या दोन देशांपुरता मर्यादित न राहता लेबनॉन आणि नंतर इराणपर्यंतही पोहोचला. काही महिन्यांपूर्वी मध्यपूर्वेतील अशांततेचा फायदा घेत अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवरदेखील हवाई हल्ले केले. त्यांचा या हल्ल्यामागील उद्देश इराणची अण्वस्त्रे बनवण्याची क्षमता नष्ट करणे हा होता. मात्र आज सहा महिन्यांनंतरदेखील अमेरिका या उद्दिष्टात यशस्वी झाल्याचे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. इराणच्या अण्वस्त्र बनवण्याच्या क्षमतेला धक्का अवश्य बसला; परंतु ती पूर्णपणे नष्ट झाली, असे आज तरी वाटत नाही. या जागतिक पार्श्वभूमीवर मे महिन्यामध्ये भारतात काश्मीरमध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी एक भ्याड हल्ला करून पंचवीस हिंदू पर्यटकांची हत्या केली. या आधीदेखील काही वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये उरी आणि पुलवामामध्ये दहशतवादी हल्ले झाले असता भारताने उत्तरादाखल पाकिस्तानवर सर्जिकल स्टाईक आणि हवाई हल्ले केले होते. म्हणजेच पहलगामच्या घटनेनंतर भारत स्वस्थ बसणार नाही, याची पाकिस्तानला जाणीव असायला हवी होती. त्यानुसार पहलगामच्या घटनेनंतर पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने ७ मे रोजी लाहोर आणि बहावलपूर येथील दहशतवादी मुख्यालयांवर दहशतवादी हल्ले केले. १९७१ च्या युद्धानंतर पाकिस्तानचे मर्मस्थान असणाऱ्या पंजाब प्रांतात प्रथमच अशा प्रकारचे हल्ले झाले. त्यानंतर ९ आणि १० मे रोजी भारताने आपली ब्रम्होस क्षेपणास्त्रे वापरून पाकिस्तानची एक तृतियांश हवाई क्षमता नष्ट केली. हे युद्ध आणखी काही काळ सुरू राहिले असते तर पाकिस्तानकडून अण्वस्त्रांचा वापर केला जाण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे भारताने हात आखडता घेऊन पाकिस्तानची शस्त्रसंधीची विनंती मान्य केली. या संदर्भात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाकिस्तान आणि भारत या दोन्ही देशांना अणुयुद्ध होऊ नये असे वाटत असल्याचे दिसते. त्यामुळेच ही शस्त्रसंधी झाली असे म्हणता येईल. वर्षअखेरीस या घटनेचे स्मरण होणे अनिवार्य आहे. दुसरीकडे, मध्यपूर्वेतील इस्त्रायलच्या बॉम्बहल्ल्यांमुळे पाश्चिमात्य देशात त्या देशाविरुद्ध जनमत तयार झाले. त्याचा फायदा घेऊन पश्चिमेच्या देशांमध्ये स्थायिक झालेल्या मुसलमानांनी अनेकदा इस्त्रायलच्या विरोधात निदर्शने केली. मग अशा प्रकारच्या तणावाच्या परिस्थितीतच काही माथेफिरू अतिरेक्यांनी ऑस्ट्रेलियामध्ये आपला सण साजरा करणाऱ्या ज्यू धर्मियांवर दहशतवादी हल्ला केला. त्यात १५-१६ नागरिक मारले गेले. वर्षाची अखेर होत असताना या घटनेने दहशतवादाचा क्रूर चेहरा नव्याने जगासमोर आणला. थोडक्यात बघायचे, तर सध्या जगभर एक प्रकारे अराजकाची स्थिती निर्माण झाली आहे. अर्थातच याला काही मूलभूत कारणे आहेत. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएत संघ या दोन लष्करीदृष्ट्या तुल्यबळ शक्ती होत्या. त्यामुळे कोणतेही स्थानिक युद्ध हाताबाहेर जात असल्याचे दिसले, तर त्यातून जागतिक अणुयुद्धाची भीती निर्माण होत असे. या दोन शक्तीमध्ये अणुयुद्ध झाल्यास संपूर्ण पृथ्वीवरील जीवन नष्ट होण्याची भीती असे. या जागतिक अणुयुद्धाच्या भीतीमुळेच स्थानिक युद्धांवरही एक प्रकारचा वचक होता आणि दोन्ही महाशक्ती एकत्र येऊन युद्ध करणाऱ्या छोट्या देशांना शस्त्रसंधी करण्यास भाग पाडत असत; परंतु १९८२ मध्ये सोव्हिएत संघाचे विघटन झाले. त्यातून निर्माण झालेला रशिया अमेरिकेला कधीच तुल्यबळ नव्हता.

# बा, तथागता! : महात्मा गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान अहिराणीतील प्रथम : प्रा. सौ. रत्नाताई पाटील, फागणे, ता. जि. धुळे


"बा, तथागता!" साहित्यविश्वातील एक अमोल लेणे. डॉ. म. सु. पगारे यांच्या अफाट सृजनशक्तीचे सम्यक दर्शन घडवणारी ही मराठी मूळ साहित्यकृती. तीही सव्वा दोनशे पानांचा परिघ व्यापणारी, एका वर्षभरात तीन आवृत्त्यांची व तीन भाषांत जाण्याची धमक दाखवते, हे खरोखर अकल्पित आहे. अलौकिक आहे. महात्मा गौतम बुद्धांवर लिहिणे, तेही काव्यातून, मोठे अवघड आणि धैर्याचे काम आहे. ते त्यांनी लीलया पेलले आहे. माझ्या माहितीनुसार मराठी वाङ्मयाच्या दालनात काव्यरूपात झळकणारी ही पहिली मराठी विशाल कादंबरी असावी. आदरणीय डॉ. पगारे सरांच्या या काव्यकर्तृत्वाचा प्रत्येक मराठी भाषकास व वाचकास अभिमान राहील. अशा असामान्य साहित्यकृतीचा तितकाच जोरकस अनुवाद प्रा. वा. ना. आंधळे यांच्या हातून होतो, हा दुग्ध-शर्करा योग म्हणावा लागेल. सुप्रसिद्ध मानवतावादी विचारवंत, समीक्षक, संशोधक तथा कवी प्रा. डॉ. म. सु. पगारे लिखित मराठी "बा, तथागता!" या काव्यकृतीचा अहिराणी बोलीतून सुप्रसिद्ध कवी प्रा. वा. ना. आंधळे यांनी केलेला अनुवाद ही अहिराणी बोलीची स्वप्नपूर्ती म्हणावी लागेल.

प्रा. आंधळे यांचे सृजन सामर्थ्य तसेच अनुवाद कौशल्य, अभ्यासू व मीमांसक दृष्टिकोन यांचा प्रत्यय काव्याच्या प्रारंभापासून ते शेवटच्या पानापर्यंत वाचनावेळी ठायी ठायी येतो. त्याचे कारणही तितकेच महत्त्वाचे ठरते.प्रा. आंधळे यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी ही अहिराणी प्रांतातील असल्यामुळे भाषिक नाळ किती दृढतेने त्यांच्या श्वासात रक्तात आहे, हे एकेका शब्दाकडे, काव्यातील ओळींकडे पाहिल्यावर मनात उभे ठाकते. त्यांच्या कल्पनाशक्तीला अहिराणी भाषेचा गवसलेला उत्तम बाज या अनुवादित विशाल काव्याचे अक्षय सौंदर्य मला वाटते. त्यांच्या या अथक परिश्रमाला आणि अनुवाद कौशल्याला माझे मनापासून अभिवादन. **"बा, तथागता!"**

साहित्यविश्वातील एक अमोल लेणे. डॉ. म. सु. पगारे यांच्या अफाट सृजनशक्तीचे सम्यक दर्शन घडवणारी ही मराठी मूळ साहित्यकृती. तीही सव्वा दोनशे पानांचा परिघ व्यापणारी, एका वर्षभरात तीन आवृत्त्यांची व तीन भाषांत जाण्याची धमक दाखवते, हे खरोखर अकल्पित आहे. अलौकिक आहे.

महात्मा गौतम बुद्धांवर लिहिणे, तेही काव्यातून, मोठे अवघड आणि धैर्याचे काम आहे. ते त्यांनी लीलया पेलले आहे. माझ्या माहितीनुसार मराठी वाङ्मयाच्या दालनात काव्यरूपात झळकणारी ही पहिली मराठी विशाल काव्यकृती असावी. आदरणीय डॉ. पगारे सरांच्या या काव्यकर्तृत्वाचा प्रत्येक मराठी भाषकास व वाचकास अभिमान राहील.अशा असामान्य साहित्यकृतीचा तितकाच जोरकस अनुवाद प्रा. वा. ना. आंधळे यांच्या हातून होतो, हा दुग्ध-शर्करा योग म्हणावा लागेल.

आदरणीय प्रा. आंधळे यांनी अहिराणीमधून "बा, तथागतास" आणून अमोल लेणे स्थापित केले, या विधानाची स्पष्टता मी साधार मांडू इच्छितो. प्रा. आंधळे यांनी अहिराणी बोलीचा बाज आणि लहेजा संभाळत, तिच्या उच्चारणानुसार केलेली लिपिबद्धता खूपच आकर्षक असून त्यांच्या अभ्यासक वृत्तीची ती निदर्शक आहे. म्हणूनच या बोली प्रांतातील वाचकाला ही साहित्यकृती त्याच्यासाठी आणि त्याच्या उद्धारासाठी लिहिली असल्याची जाणीव लगेच होते. असं होणं किंवा असं वाटणं हे यशस्वी साहित्यकृतीचं प्रमाण मला वाटतं. तथागतांचं हे तत्त्वज्ञान म्हणूनच वाचकाच्या मनापर्यंत सहज जाणून पोहोचणार आहे, हा माझा







ठाम विश्वास आहे. यातील संवाद, गुरु-शिष्य उपदेश, अज्ञानाचा अंधकार, ज्ञानाचा लखलखीत प्रकाश, मानवी जीवनमूल्यांची केलेली रुजवात — या सर्व बाबींमुळे अहिराणी बोलीतून आलेलं हे अमोल लेणे हा निधीच मला मनःपूर्वक करावासा वाटतो.

**"अंतर्मुख करणारी कविता"**

कोणत्याही साहित्यकृतीचं श्रेष्ठत्व तिच्या बाह्यरूपावरून वा वरवर चाळून पाहता ठरत नाही. त्यातील विचारांनी वाचक अंतर्मुख व्हायला हवा. हे भाषांतर करताना प्रा. आंधळे यांनी या विशाल काव्याच्या वाचनासोबत चिंतनावर कसोशीने दिलेला भर, कवितेचा अभावात्मक आवाका, तिचा गाभा समजून घेत केलेले हे भाषांतर, आणि मूळ कवी डॉ. पगारे यांनी मोजक्या शब्दांत आशयाची केलेली सुसूत्र बांधणी — या सर्व गोष्टी वाचकास अंतर्मुख करण्यात कमालीची यशस्वी ठरल्या आहेत.

सदर विशाल काव्य तीन भागांत विस्तारले असून माणूस, मानवता आणि संस्कार या पैलूंवर कवीची दृष्टि झळकताना दिसते. माणूस ओळखण्यासाठी त्याचं बाह्यरूप न पाहता, त्याचे विचार, आचार आणि समाजाप्रती त्याचं देणं काय? हा विचार

प्रकर्षाने मांडलेला दिसून येतो. मूळ कवी आणि अनुवादक या दोघांनीही हे तत्त्वज्ञान मराठी व अहिराणीमध्ये काव्यरूपात आणताना मोठी खबरदारी घेतलेली दिसते. ते एकसुरी व एकांगी होऊ नये, ही बाब कटाक्षाने पाळलेली दिसते.

**"मोक्ष, ईश्वरवाद व कर्मकांडांचा थोतांड"**

ईश्वरीय संकल्पना, धर्मांधता, जातपात विषमता, स्वार्थी गुलामगिरी, लिंगभेद, कर्मकांड, दहशतवाद — यांचा सखोल विचार येथे केलेली मांडणी या गोष्टी मानवाचा बुद्धिभेद करतात. उच्चनीचतेची दरी निर्माण करतात. त्यातून श्रेष्ठ–कनिष्ठ ठरवतात. श्रेष्ठत्वाच्या बळावर कनिष्ठांना गुलाम करतात. हा भाकडपणा निर्माण करून मानवाला अज्ञानाच्या खाईत लोटून पिढ्यान्‌पिढ्या गारद केले जाते. यासाठीच महात्मा गौतम बुद्धांनी हा आर्यअष्टांगिक मार्ग दाखविला.

या मार्गाचे विवेचन मूळ कवीने ज्या सैद्धांतिक पद्धतीने केले आहे, त्यास तोड नाही; आणि अनुवादक कवीने अनुवाद करताना त्याचा पेललेला तोल आणि राखलेला बाज अधोरेखित करावा असा आहे. हजारो वर्षांपूर्वी तथागतांनी दिलेले हे दिव्यज्ञान समाजमनात रुजले नसल्याची खंत डॉ. म. सु. पगारे या प्रतिभावंत कवीच्या मनाला ग्रासते आणि या विशाल काव्याचा जन्म होतो. प्रस्तुत काव्यात कवी म्हणतो. मानवाचे विचार सकारात्मक आणि विकासशील असतील तरच खरी संस्कृती आकारास येईल व मानवाची प्रगती होईल. परंतु संस्कृतीला दुर्दैवाने विकृतीची जोड दिली गेली आणि मानवाच्या बुद्धीला पायबंद घातला गेला. संस्कृतीत घातलेल्या या खोड्यांनी छोट्या छोट्या गोष्टींचा धाक दाखवण्यात आला. देव, पूजा-अर्चा, पाप-पुण्य, यज्ञयाग, होमहवन, अंधभक्ती — या सर्व कर्मकांडात माणूस गुंतवला गेला. माणसाचे मोठेपण त्याच्या जीवनात कशात आहे, हे सांगताना कवींच्याच शब्दांत पाहू या.

*"मळले वाटस माणसाला चिंतनात*
*दोन गोष्टींसाठी हवं मोठेपण*
*माणसाला यादगिरीने नोंद करणी पडीन....*
*कर्तृत्व आणि कर्तव्यभावना आणि दुसरी कर्तव्यभावना."*
*माणूस निरनिराळ्या विचारांचा असला तरी त्यांच्यावर*
*गुलामगिरी, जात, धर्म, लिंग, पंथ, प्रदेश यांची बंधने नको.*
*प्रत्येक माणसाने मुक्त श्वास घेऊन जगले पाहिजे.*
*वर्तमान त्याला जगता आले पाहिजे. "बा, तथागता"*
*अहिराणी आवृत्तीचे अनुवादक कवी प्रा. वा. ना. आंधळे*
*यांच्या अनुवाद कौशल्यावर बोलावे तेवढे थोडेच होईल.*
*अनुवाद करणे हे मोठे जिहान आणि धैर्याचे व तितकेच*
*जोखमीचे काम असते.* अनुवादक हा स्वतः प्रतिभा संपन्न असणे आवश्यक असते. शिवाय मूळ भाषा व अनुवादाची भाषा यांच्या भाषिक सौंदर्याची सखोल जाण असणे तितकेच गरजेचे असते.

प्रा. आंधळे यांच्या विलक्षण काव्य प्रतिभेचे तुम्ही आम्ही साक्षीदार आहोत. त्यांची काव्यसाधना पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून महाराष्ट्रातून सर्वश्रुत आहे.



# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात 12 वी च्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा समारंभ उत्साहात संपन्न

**परळी वैजनाथ | (प्रतिनिधी)**

शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला कनिष्ठ महाविद्यालयात १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, संचालिका छायाताई देशमुख, प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे, प्रा डॉ अरुण चव्हाण उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व माता सरस्वतीच्या फोटोस पुष्पहार अर्पण करण्यात आला. पाहुण्यांच्या स्वागतानंतर १२ वीच्या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली. यानंतर प्रमुख मार्गदर्शक प्रा डॉ अरुण चव्हाण यांनी विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी अंगी बाळगणे आवश्यक आहे, रिल्स सोडून रियल जीवन जगले पाहिजे. निरंतर, लक्षपुर्वक, परिश्रमपूर्वक अभ्यास केल्यास उज्ज्वल भविष्य घडेल व माणूसकीला जपा असा संदेश दिला. तर प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात शिस्त, अभ्यास,मैत्री शिकवली जाते. जिवनात यश अपयश येते, अपयश आल्यानंतर खचून न जाता त्याचा सामना केला पाहिजे, विद्यार्थ्यांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता असली पाहिजे असे मत यावेळी व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोप करताना प्रा प्रसाद देशमुख यांनी सांगितले की, कोणतीही परिक्षा शेवट नसते, परिक्षा देताना कोणताही ताण न घेता मोकळ्या मनाने परिक्षेला सामोरे जा, ध्येय साध्य करण्यासाठी उदिष्ट असतात, ज्या क्षेत्रात जायचे आहे त्यासाठी स्कील वाढवा यश आपोआप मिळते. प्रा प्रविण फुटके यांनी १२ वी नंतर विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञानाच्या युगात अनेक नवीन संधी उपलब्ध झालेल्या आहेत. या संधीचा फायदा घ्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा अशिलता शिंदे यांनी केले. सुत्रसंचलन व आभार ११ वीच्या विद्यार्थ्यांनी मानले. कार्यक्रमास प्रा प्रविण नव्हाडे, प्रा अशोक पवार, प्रा विशाल पौळ, प्रा डॉ विना भांगेसह विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलला जागतिक स्तरावरील मानाचा पुरस्कार

**महागाव | प्रतिनिधी**

प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलला वर्ल्ड लीडर्स समिट अँड अवॉर्ड्स 2026 मध्ये “होलिस्टिक अकॅडमिक एक्सलन्ससाठी उत्कृष्ट शाळा” हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आणि सर्वांगीण विकासावर दिलेल्या भराचा गौरव झाला आहे.

हा सन्मान पद्मविभूषण डॉ. करण सिंह यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनपर आशीर्वादामुळे शाळेच्या कुटुंबियांना विशेष प्रेरणा मिळाली असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.




प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलने केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर विद्यार्थ्यांचा बौद्धिक, नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास साधण्यावर सातत्याने भर दिला आहे. नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, अनुभवी शिक्षकवर्ग आणि शिस्तबद्ध शालेय वातावरण यामुळे शाळेने अल्पावधीतच शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या गौरवास्पद यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी व पालकांनी आनंद व्यक्त केला असून, भविष्यातही शाळा अशीच प्रगती करत नवे शिखर गाठेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# अंबाजोगाई येथील श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालय प्रगती विभागाने मैदानी स्पर्धा गाजवली

**अंबाजोगाई | (प्रतिनिधी)**

शालेय अभ्यासक्रमाबरोबरच स्पर्धा परीक्षा, संगीत परीक्षांमध्ये यश संपादन केल्यानंतर आता प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही भरारी घेतली आहे, हे विशेष व उल्लेखनीय ठरत आहे. श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या प्रगती विभागाने मैदानी स्पर्धा गाजवली आणि जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

बीड जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या जिल्हा सब-ज्युनियर गट (२०२६-२७) निवड चाचणी मैदानी क्रीडा स्पर्धा रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई येथे उत्साहात घेण्यात आल्या. या जिल्हास्तरीय स्पर्धेत श्री खोलेश्वर




प्राथमिक विद्यालय (प्रगती विभाग), अंबाजोगाई येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करीत शाळेच्या नांवाला गौरव प्राप्त करून दिला आहे. विजेते विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत. १) कु.राजवी ज्ञानेश्वर धुमाळ - ५० मीटर धावणे (जिल्ह्यात प्रथम), तर लांब उडी (जिल्ह्यात तृतीय), २) कु.सर्वेश्वरी आनंद गणोरकर - ५० मीटर धावणे (जिल्ह्यात द्वितीय), तर १०० मीटर धावणे (जिल्ह्यात द्वितीय), ३) कु.श्रावणी शुभम वैष्णव - स्टँडिंग ब्रॉड जंम्प (जिल्ह्यात द्वितीय), ४) कु.संस्कृती सुरज वैष्णव - ५० मीटर धावणे (जिल्ह्यात द्वितीय), ५) राजेश दयाराम सिरसाट - १०० मीटर धावणे (जिल्ह्यात प्रथम), ६) कु.रिया व्यास दहिफळे - स्टँडिंग ब्रॉड जंम्प (जिल्ह्यात द्वितीय), ७).कु. आराध्या संतोष भाकरे - स्टँडिंग ब्रॉड जंम्प (जिल्ह्यात तृतीय), ८) कु.स्वराली संतोष कापसे - स्टँडिंग थ्रो, १ किलो ग्रॅम (जिल्ह्यात तृतीय) आणि ९) चि.प्रिन्स नारायण मुसळे - स्टँडिंग ब्रॉड जंम्प (जिल्ह्यात प्रथम) या सर्व विद्यार्थ्यांची विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली असून ही शाळेसाठी अभिमानास्पद बाब आहे. या यशामागे बलोपासक मंडळ प्रमुख परमेश्वर राठोड, विभागप्रमुख सौ.वर्षा मुंडे तसेच मुख्याध्यापक विष्णू सोनवणे सर व शालेय समिती अध्यक्ष उन्मेष मातेकर व सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्रजी आलुरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ.सौ.कल्पना चौसाळकर, राम कुलकर्णी, अविनाश तळणीकर, नितीन चौधरी, खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे, कार्यवाह किरण कोदरकर, प्राथमिक विद्यालय शालेय समितीचे अध्यक्ष उन्मेश मातेकर तसेच शाळेतील सर्व पालकांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय महिनाभरात कार्यान्वित होणार

## मुरुडकरांनी विकासाच्या पाठीशी राहावे आ. रमेशआप्पा कराड यांचे आवाहन

**लातूर | प्रतिनिधी**

भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून मुरुडच्या विकासाला गती मिळाली. उपजिल्हा रुग्णालयासह मुरुडच्या पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर असून सर्व सोयींनी युक्त बसस्थानक उभारण्यात आले. ग्रामपंचायतीला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासन दरबारी असून वर्षभरात मंजुरी मिळवून घेणार असल्याची ग्वाही देऊन येत्या महिनाभरात मुरुड येथे अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित होणार असून ही तालुका निर्मितीची पहिली पायरी आहे तेव्हा मुरुडकरांनी विकासाच्या पाठीशी राहून भाजपाच्या उमेदवारांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

भारतीय जनता पार्टीचे मुरुड जिल्हा परिषद गटातील उमेदवार सौ. रंजनाताई बळीराम हिंगले, मुरुड - १ पंस गणातील उमेदवार उद्धव सूर्यभान चव्हाण आणि मुरुड - २ पंस गणातील उमेदवार सौ. मनिषा सचिन देवकर यांच्या प्रचारार्थ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी सायंकाळी मुरुड येथे भव्य प्रचार जाहीर सभा झाली. या सभेस माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, मुरुडच्या सरपंच अमृताताई अमर नाडे, उपसरपंच वैभव सापसोड, भाजपाचे महेश कणसे, विजय काळे, लताताई भोसले, उषाताई शिंदे, रवी माकुडे, लहू सव्वाशे, नागराज बचाटे, संतोष काळे, आबू देवकर, वैजनाथ हराळे, शहानुर पठाण, सुरज सूर्यवंशी, शाम करपे, रमाकांत गायकवाड, विष्णू महानवर, शाहीन सय्यद, अशोक चव्हाण, योगेश पुदाले, दत्ता पुदाले यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. मुरुड येथील भाजपाच्या या प्रचार जाहीर सभेस प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता यात महिलांची संख्या लक्षणीय दिसून आली. आ. कराड यांचे मुरुड नगरीत आगमन होताच फटाक्याची



आतिषबाजी करून ढोल ताशाच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले.

या जाहीर सभेत बोलताना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेली वीस - पंचवीस वर्ष ज्यांनी मुरुडवर राज्य केले त्यांनी मुरुड साठी काय केले असा प्रश्न उपस्थित करून मुरुड हे बाजारपेठेचे मोठे गाव असून प्रत्येक वेळी विकासाला आडवे येऊन मुरुडला विकासापासून वंचित ठेवण्याचे पाप केले. प्रत्येक वेळी आपल्या सोयीनुसार कधी घड्याळ, कधी तुतारी तर जमल तेव्हा हात. नेमके हे आहेत तरी कुठे असा प्रश्न उपस्थित करून स्वतःसाठी सातत्याने राजकीय भूमिका बदलणाऱ्यांना मतदारांनी जागा दाखवावी असे बोलून दाखवले.

या मतदार संघावर पन्नास वर्षे सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसवाल्यांनी सातत्याने मुरुडकडे दुर्लक्ष केले असून विकासाची कोणतीही योजना मंजूर केली नाही उलट आमदार होऊन मला एक वर्ष झाले भाजपा शासनाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून विकास आणि विकास निधी काय असतो हे दाखवून देण्याचे काम केले असल्याचे सांगून पुढे बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, केंद्रातील मोदीजींच्या आणि राज्यातील देवेंद्रजी फडणवीस यांच्या शासनाच्या माध्यमातून सिमेंट रस्ते, आरोग्याच्या सुविधा, पाणी पुरवठ्याच्या योजना यासह विविध विकास कामातून विकासाची मोठी उंची गाठली असून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला शेतकरी पेन्शन, शेतीला मोफत वीज, लाडकी बहीण, महिलांना प्रवासात सवलत, मागेल त्याला शेततळे, गाय गोठे, मोफत अन्नधान्य, घरकुल, सौर ऊर्जा पंप यासह विविध योजनेच्या माध्यमातून दिलासा देण्याचे काम झाले. आपल्या गावाच्या आणि परिसराच्या विकासासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही तेंव्हा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतील भाजपाच्या तिन्ही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आव्हान केले.

# संत विचारच माणसाचे खरे तारणहार! -प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये

नांदेड: येथे संपन्न दिनांक ३ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या श्री संत भगवान बाबा जयंतीच्या निमित्ताने आयोजित “चला, संत विचारांनी महाराष्ट्र जागवूया” या विषयावर संत साहित्याचे साक्षेपी अभ्यासक, कवी, कीर्तनकार, लेखक, योगा-प्राणायाम प्रशिक्षक प्रा. डॉ.विठ्ठल जायभाये बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंगोली जिल्हा कार्यकारी अधिकारी श्री नामदेव केंद्रे, उद्घाटक नांदेड शहर वाहतूक पोलीस निरीक्षक श्री साहेबराव गुट्टे होते. याशिवाय श्री गोविंद नादेडे, श्री संतोष तांबे, शिवा कांबळे, उमेश मुंडे, संतराम गित्ते, अनिता मुंडे, प्रवीण केंद्रे आदि मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्य आयोजक श्री विठ्ठल पावडे, पावडेवाडी नांदेड यांनी करताना, महाराष्ट्रामध्ये विस्कटत चाललेली सामाजिक विण जर अबाधित ठेवायची असेल तर सर्व जाती, धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन संत आणि महापुरुषांच्या जयंती करणे काळाची गरज आहे असे सांगितले. त्याचबरोबर श्री गोविंद नांदेड साहेबांनी संतांचा विचार नित्य समाजाला तारक आहे असे प्रतिपादन केले. सामाजिक कार्यकर्त्या अनिताताई मुंडे यांनी सुद्धा पुरुषांबरोबर स्त्रियांनी सुद्धा प्रबोधनात्मक विवेकी वाचन चिंतन करणे काळाची गरज आहे असे सांगितले. सुप्रसिद्ध कवी श्री शिवाजी कांबळे यांनी संत साहित्यिक आणि महापुरुष हेच खरे आपले आदर्श आहेत आणि आपण त्या मार्गाने चालले पाहिजे असे प्रतिपादन केले. प्रमुख व्याख्याते प्रा.डॉ.जायभाय यांनी चला संत विचारांनी महाराष्ट्र जागवूया या विषयाच्या अनुषंगाने तब्बल दीड तास विवेचन मांडले. त्यामध्ये गौतम बुद्ध, सॉक्रेटिस, चक्रधर, बसवन्ना आदि संतांच्या विचारांचे विवेचन करतांना या सर्वांनी माणूस केंद्रस्थानी ठेवून आपला विचार प्रसार केला. नामदेव, ज्ञानदेव, जनाबाई, चोखामेळा, सावतोबा, गोरोबा आदी संतांचे कार्य विशद करताना जात-धर्म-पंथ-लिंग भेदाच्या पलीकडे या संतांनी वारकऱ्यांचा विचार मेळा जमवला. श्री विठ्ठल मंदिरामध्ये प्रवेश नसताना दुर्लक्षित, गावकुसातून आलेल्या सामान्य वारकऱ्यांनी पंढरीच्या वाळवंटामध्ये समतेची स्वातंत्र्याची विचार पताका फडकवत असताना नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी हा मूलमंत्र वारकरी सांप्रदायाला दिला. शांतीब्रम्ह नाथ बाबांनी श्रीक्षेत्र पैठण येथे अस्पृश्य लोकांना आपल्या वडिलांच्या वर्ष श्राद्धानिमित्त जेऊ घालून वारकरी संप्रदायाच्या समता ममता क्रांतीला नवा विचार दिला. सतराव्या शतकामध्ये वारकरी सांप्रदायाच्या या




कार्याला कळस चढवण्याचे काम संत तुकोबाराय यांनी केले. संतांची ही क्रांती सातत्याने सुरू असताना १८ आणि १९ व्या शतकामध्ये मराठवाड्यामध्ये कृतिशील समाजसुधारक संत भगवान बाबा यांचे कार्य अतुलनीय आहे. संत भगवानबाबांनी अहिंसा, समता, स्वातंत्र्य यासाठी काम करताना मिड सांगवी, भोगलवाडी, चिंचाळा आदी ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह घेऊन तेथील प्राणी हत्या बंद करून लोकांना सन्मार्गाला लावले. श्री संत भगवान बाबांनी क्रांतीसिंह नाना पाटलांच्या सोबतीने निजाम, इंग्रजांच्या विरोधामध्ये कीर्तनाच्या माध्यमातून प्रचार प्रसार कार्य केले. संत भगवान बाबा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट झाली. त्यानंतर बाबांनी श्रीक्षेत्र भगवान गड येथे मुलांसाठी शाळा-वसतिगृह बांधून आपण फक्त किर्तन आणि देवदेव करणारे नसून कृतिशील समाज सुधारक आहोत हे दाखवून दिले. त्याचबरोबर गाडगेबाबा तुकडोजी महाराज मारोतराव महाराज नथुराम महाराज मोवणकर महाराज फळेकर महाराज आदीनी महाराष्ट्रातील अठरापगड जातीमध्ये एकोपा, सलोखा, सौहार्द पेरण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. अलीकडे समाजातील प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सौहार्द, मैत्र्यभाव लोप पावत असताना तुम्हा आम्हा सर्वांना मिळून समाजामध्ये ह्या मूलगामी गोष्टी पुन्हा नव्याने सांगण्याची वेळ आलेली आहे .